माहिती हवीय?

रविकांत साखरे, जामखेड.

□ गौतमबुद्धांच्या जीवनावर आतापर्यंत किती चित्रपट निघाले आहेत? दिग्दर्शक कोण?

— १९२५चा *द लाईट ऑफ एशिया* हा मूकपट गौतमबुद्धाच्या जीवनावरील पहिला चित्रपट. हिमांशू रॉयनी या चित्रपटात बुद्धाची भूमिका केली होती आणि फ्रॅन्झ ओस्टेन यांच्या सहकार्याने या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांनी केले होते. त्यानंतर १९५७ साली राजबन्स खन्नानी बुद्धाच्या जीवनावरील *गौतम द बुद्ध* हा अनुबोधपट निर्माण केला होता. या चित्रपटात कोणी कलाकार नव्हते. बुद्धकालीन लेण्यातून या चित्रपटात बुद्धाचे जीवन पडद्यावर उभे करण्यात आले होते. या दोन चित्रपटानंतर बुद्धाच्या जीवनावर कोणताही चित्रपट निर्माण झाला नाही. पण बुद्धकालीन कथेवरील *चित्रलेखा* (१९४१ व १९६४, दिग्दर्शकः केदार शर्मा), *आम्रपाली*(१९४५ दिग्दर्शक नंदलाल-जसवंत लाल, १९६६ दिग्दर्शक लेख टंडन), *अंजली*(१९५७ दिग्दर्शक चेतन आनंद), *अंगुलीमाल*(१९६६ दिग्दर्शक विजय भट्ट), *सम्राट अशोक* (१९४७ दिग्दर्शक के.बी.लाल), *असोका द ग्रेट*(२००१ दिग्दर्शक संतोष सिवन) यासारखे अनेक चित्रपट निर्माण झाले आणि त्यातले बरेचसे आजही सिनेचाहत्यांच्या मनात घर करून आहेत.

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ भारतातील पहिला फिल्म स्टुडियो कोणता?

— दादरला रणजीत स्टुडियोच्या रस्त्याचे आज नाव आहे फाळके रोड. *राजा हरिश्चंद्र* हा पहिला भारतीय चित्रपट निर्माण करण्यासाठी दादासाहेब फाळकेंनी १९१३ला या जागी एक स्टुडिओ उभारला होता. तोच भारतातील पहिला स्टुडिओ.

लीना सावंत, कांदिवली.

□ राजेंद्रकुमार व माला सिन्हा यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता? दिग्दर्शक कोण?

— १९५८चा *देवर भाभी* राजेंद्रकुमार व माला सिन्हा यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट. पण या चित्रपटातील त्यांची भूमिका नायक-नायिकेची नव्हे तर देवर-भाभीची होती. बलराज साहनींनी या चित्रपटात माला सिन्हाच्या पतीची व राजेंद्रकुमारच्या वडील भावाची भूमिका केली होती. केदार कपूर या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. १९५९च्या *धूल का फूल*मध्ये राजेंद्रकुमार व माला सिन्हा सर्वात प्रथम नायक-नायिकेच्या भूमिकेत चमकले. यश चोप्रा या चित्रपटाचे दिग्दर्शक होते.

□ रीना रॉय, बरखा रॉय, राजीव रॉय, राहुल रॉय व बिमल रॉय यांचं नातं काय?

— रीना व बरखा रॉय बहिणी, अन्य रॉय मंडळींशी त्यांचं काही नातं नाही. बिमल रॉय, राहुल रॉय व राजीव रॉय यांचंही परस्परांशी काही नातं नाही.

सुरेश जाधव, भोसरी, पुणे.

□ 'आम्ही जातो आमुच्या गावा...' हे गाणं कोणावर चित्रित करण्यात आलं होतं?

— १९३६च्या *संत तुकाराम* या चित्रपटात विष्णूपंत पागनीस यांच्यावर व १९६४च्या *तुका झालासे कळस*मध्ये कुमार दिघेवर.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ 'मेरी तस्वीर लेकर क्या करोगे...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील? संगीतकार, गीतकार कोण?

— रफी-आशा व अन्य कलाकारांनी कोरसबरोबर गायलेलं हे गाणं १९६३च्या *काला समंदर* या चित्रपटात होतं. एन. दत्तानी दत्ता नाईक या आपल्या मूळ नावाने या चित्रपटाला संगीत दिलं होतं. आनंद बक्षी या गाण्याचे गीतकार होते.

□ 'अखिया मिलाके जिया भरमाके...' या गीताचे गायक-गायिका कोण? चित्रपट कोणता? नायक-नायिका कोण?

— १९४४ च्या *रतन* या चित्रपटात जोहराबाई अंबालावालीने हे गाणं गायलं होतं. करण दिवाण व स्वर्णलता या चित्रपटातील नायक-नायिका होते.

नलिनी संख्ये, विदर्भ.

□ अशोककुमार, किशोरकुमार, राज मेहरा यांच्या एका चित्रपटात किशोरकुमारच्या मुक्या मुलाची भूमिका करणारा कलाकार कोण होता? त्या चित्रपटाचं नाव काय होतं?

— तो बालकलाकार अशोककुमारचा मुलगा नसून किशोरकुमारचा मुलगा आणि सध्या पार्श्वगायक म्हणून प्रसिद्ध असलेला अमितकुमार आहे. त्याची भूमिका असलेला हा चित्रपट होता *दूर गगन की छांव में*. हा त्याचा पहिलाच चित्रपट होता.

□ संजीवकुमार आणि स्मिता पाटील यांनी कधी एकत्र चित्रपट केले आहेत का? कोणते?

— *कांच की दिवार*, *राही* आणि *उंच नीच बीच* या चित्रपटांत संजीवकुमार - स्मिता पाटील यांनी एकत्र काम केलं होतं. दुर्दैवानं हे दोन्ही कलाकार आता हयात नाहीत.

रविकांत साखरे, जामखेड.

□ एकाच कलाकाराने दोनपेक्षा अधिक भूमिका केल्या आहेत, असे चित्रपट कोणते? त्या भूमिका साकार करणाऱ्या कलाकारांची नावं काय?



***नया दिन नयी रात*मध्ये संजीवकुमारने साकारलेल्या नऊ भूमिकांपैकी एक**

— १९७४च्या *नया दिन नयी रात* या चित्रपटात संजीवकुमारने नऊ भूमिका केल्या होत्या. हा चित्रपट आधी *नवरात्री* या नावाने तामिळीत आला होता. या तामिळी चित्रपटात शिवाजी गणेशननी नऊ भूमिका केल्या होत्या. मूकपट जमान्यात १९२८ला आलेल्या *विश्वमोहिनी* या मूकपटात अभिनेत्री जोहर मामाजीवालानी तर १९३२च्या *कैलाश* या मूकपटात ललिता पवारनी तीन-तीन भूमिका केल्या होत्या. १९७०च्या *हमजोली*त मेहमूदने, १९७६च्या *बैराग*मध्ये दिलीपकुमारने, १९८३च्या *महान*मध्ये अमिताभने, १९८४च्या *जॉन जानी जनार्दन*मध्ये रजनीकांतने, १९९०च्या *अप्पू राजा*मध्ये कमल हासनने तीन-तीन भूमिका केल्या होत्या.